Young Researcher
Peer Reviewed | International | Open Access Journal
ISSN: 2277-7911 | *Website: https://yra.ijaar.co.in/* | ***Volume-14, Issue-2 |***
***April - May – June 2025***

**Original Article**

# श्री समर्थ रामदासांच्या श्री मनाचे श्लोक साहित्यातील व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठीच्या विचारांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. अशोक शामराव चव्हाण**

*श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव*

**Manuscript ID:**
yrj-140225

**ISSN: 2277-7911**
**Impact Factor – 5.958**

**Volume 14**
**Issue 2**
**April-May-June 2025**
**Pp. 198 - 202**

**Submitted:** 07 June 2025
**Revised:** 21 June 2025
**Accepted:** 26 June 2025
**Published:** 30 June 2025

***Corresponding Author:***
*प्रा. डॉ. अशोक शामराव चव्हाण*

Quick Response Code:

Web. https://yra.ijaar.co.in/

DOI:
10.5281/zenodo.23409441

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.23409441

Creative Commons

## प्रस्तावना:

श्री संत ज्ञानेश्वर पासून श्री संत तुकाराम, निळोबाराय अशी खूप मोठी संत परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. या संत परंपरेत त्या त्या काळातील संतांच्या विपुल साहित्याने विचाराने, आचाराने केवळ महाराष्ट्रात नव्हे तर जिथे जिथे संत पोहचले, त्यांचे साहित्य विचार पोहोचले त्या त्या समाजावर प्रभाव टाकला आहे. संतांच्या विचारांचे मानवी मनावर अनेक संस्कार झाले आहेत. मानवी आचरण व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठी पोषक होण्यासाठी, वर्तन नियंत्रित करण्यासाठी, मानवी वर्तनात नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी संत विचार प्रभावी ठरले आहेत, ठरत आहेत. श्री संत परंपरेने समाजातील अंधश्रद्धा, समाज व व्यक्ती स्वास्थ्याला बाधक प्रथा परंपरा याबाबत जनजागृती केलीच त्याचबरोबर या बाबी व्यक्ती व समाज मनातून समूळ जाण्यासाठी त्यांनी व्यक्तींच्या मनावर संस्कार करून, व्यक्ती व समाज स्वस्त्यासाठी प्रयत्न केले. यासंदर्भातील संत साहित्याचा विचार करता श्री संत रामदासांच्या ‘श्री मनाचे श्लोक’ या ग्रंथातील व्यक्ती व समाजशास्त्रासाठीचे विचार अभ्यासास पोषक आहेत का ? वर्तमान काळात हे विचार कोणती भूमिका पार पाडू शकतात का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी ‘श्री मनाचे श्लोक’ मधील विचारांचा सामाजिक मानसिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याच्या उद्देशाने अभ्यासकाने श्री समर्थ रामदासांच्या ‘श्री मनाचे श्लोक’ साहित्यातील व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठीच्या विचारांचा समाजशास्त्रीय अभ्यास हा अभ्यास विषय निवडला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*प्रा. डॉ. अशोक शामराव चव्हाण (2025) श्री समर्थ रामदासांच्या श्री मनाचे श्लोक साहित्यातील व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठीच्या विचारांचा समाजशास्त्रीय अभ्यास. Young Researcher, 14(2), 198-202. https://doi.org/10.5281/zenodo.23409441*

**उद्देश :**

1) संत साहित्य ‘श्री मनाचे श्लोक’ मधील विचारांचे व्यक्ती व समाजदृष्टीने महत्त्व अभ्यासणे
2) ‘श्री मनाचे श्लोक’ मधील विचारांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन समजणे
3) व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठी ‘श्री मनाचे श्लोक’ तील विचारांचे योगदान अभ्यासणे

**अभ्यासाचे गृहीतक :**

व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठी ‘श्री मनाचे श्लोक’ या संत साहित्यातील विचार खूपच सहाय्यकारी आहेत.

**तथ्य संकलन व अभ्यास पद्धती :**

सदर संशोधन लेखासाठी पूर्णपणे द्वितीय तथ्य असणाऱ्या साहित्यावर अवलंबून असून या अध्ययनासाठी साहित्याचे आशय विश्लेषण तंत्र वापरले गेले. आहे यासाठी श्री संत रामदासाचे ‘श्रीमत दासबोध’, ‘श्री मनाचे श्लोक’ या साहित्याची तसेच या साहित्यावर लिखाण असणाऱ्या इतर संदर्भ पुस्तके, मासिके यांचा सदर अभ्यासासाठी वापर करण्यात आलेला आहे.

**श्री मनाचे श्लोकातील विचारांचे व्यक्ती व समाज दृष्टीने महत्त्व :**

श्री संत परंपरेतील सर्व संतांचे लिखाण साहित्य याला ग्रंथ, श्लोक, अभंग, भारुड, ओवी, भजन या नावाने ओळखले जाते हे सर्व अध्यात्मिक लिखाण म्हणून मानले जाते यामध्ये परमार्थीक जीवन संबंधाचे अध्यात्मिक उपदेश मानले जाते. पण याचबरोबर हे साहित्य विचार एक व्यावहारिक कृतीशील व कृती प्रधान व समग्र जीवन विषयक दर्शन आहे. कारण यातून निकोप व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठी आवश्यक वर्तन विषयक ज्ञान ही आहे. व्यक्ती व समाजस्वास्थ्यासाठी नेमके वर्तन कसे असावे की ज्यामुळे एक निकोप व्यक्ती निकोप समाज, एक स्वास्थ्यपूर्ण समाजाचे निर्माण होईल याची मार्गदर्शन आहे. अशा अनेकविध श्री संत साहित्य विचारातील ‘श्री मनाचे श्लोक’ हे एक आहे.

कारण ‘श्री मनाचे श्लोक’ मध्ये व्यक्ती व त्यायोगे समाज यांच्या आरोग्यासाठीचे मार्गदर्शन आहे. विशेष: यामध्ये ‘मानसिक आरोग्याला’ प्राधान्य दिले आहे. आणि शारीरिक आरोग्य व मानसिक आरोग्य परस्परसंबंधी व परस्परावलंबी आहे कारण निरोगी शरीरासाठी निरोगी मनाची गरज असते व या प्रक्रियेतून व्यक्ती निरोगी व त्यातून समाज निरोगी बनण्याची सामाजिक प्रक्रिया होते.

म्हणूनच श्री संत रामदासाचे ‘मनाचे श्लोक’ म्हणजे मनाला द्यावयाची शिकवण आहे. संस्कार संक्रमणाची प्रक्रिया आहे. ‘मन’ या केंद्रा भोवती फिरणाऱ्या या श्लोकातून अंत:करण, चित्त, मन यांच्या शुद्धीपासून व्यावहारी, कृती प्रधानता ही दिसून येते. कारण व्यक्तीच्या माध्यमातून समाजाला

सुस्थिर, सबल आणि सुसंघटित करण्याची प्रक्रिया स्पष्ट होते.

**श्री मनाचे श्लोक मधील विचारांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन :**

समकालीन समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून ‘श्री मनाचे श्लोक’ हे श्लोक केवळ धार्मिक उपदेश राहत नाहीत तर ती स्वास्थ्यपूर्ण, आरोग्यपूर्ण व्यक्ती व समाज निर्मितीसाठी आवश्यक सामाजिक समरसता, सामाजिक एकात्मता, सामूहिक कार्यक्षमता, नैतिक मूल्यांचे अधिष्ठान निर्मितीची एक समाज रचनात्मक रूपरेषा ठरते.

समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स च्या ऐतिहासिक भौतिक वादाच्या दृष्टिकोनातून पाहता श्री संत रामदास कालीन महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती ही एका संक्रमण काळाची होती. ज्यामध्ये जुन्या फ्युडल व्यवस्थेचे विघटनाची प्रारंभिक वैचारिक सुरुवात होती. तर नव्या राष्ट्रीय एकात्मतेची (स्वराज्य) पाया भरणीची वेळ आली होती. अशा परिस्थितीत श्री संत रामदासांच्या ‘श्री मनाचे श्लोक’ मधील विचार हे ‘वर्ग संघर्षाला’ (क्लास स्ट्रगल) ला दिशा देण्यापेक्षा ‘सामाजिक एकता’ ला दिशा देण्याची होते.

समाजशास्त्रज्ञ डूरखाईम यांनी ‘अनोमी’ (anomie) ही संकल्पना मांडली. ज्याचा अर्थ सामाजिक मूल्ये, नियम आणि दिशा निर्देश विस्कळीत झाल्याने निर्माण होणारी नैतिक मूल्यहिनता, दिशाभूल व मानसिक अशांतता होय. संत रामदासांच्या काळातील सामाजिक विस्कळीतपणा हे अशा अनोमीचेच उदाहरण होते. यावर संत रामदासांनी ‘मनाचा निग्रह’ हा उपाय दिला. हा उपाय केवळ वैयक्तिक नाही तर समाजशास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाचा आहे. डूरखाईम यांनी सुचवल्याप्रमाणे सामाजिक एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी ‘सामूहिक विवेक’ मजबूत करणे आवश्यक असते व समाजातील प्रत्येक व्यक्तीचे मन शांत, नियंत्रित व विशिष्ट सामूहिक हितासाठी एकाग्र झाले तरच ते सामूहिक विवेकाचा भाग बनते. ‘मनाचा निग्रह’ म्हणजेच व्यक्तीच्या अंतकरणातील अनोमीवर मात करून, तिला सामाजिक नियमांशी सुसंगत करण्याची प्रक्रिया आहे. जी ‘श्री मनाच्या श्लोकातून’ करण्याचा प्रयत्न दिसतो.

**व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठी श्री मनाचे श्लोकातील विचार अभ्यासणे :**

१ मनावासना दुष्ट कामा नये रेI
मना सर्वथा पाप-बुद्धी नको रेI
मना धर्मता नीती सोडू नको होI
मना अंतरी सार विचार राहोII

या श्लोकात दुष्ट वासना आणि पापबुद्धी यामध्ये व्यक्ती व सामाजिक जीवनाच्या अशांततेचे अनारोग्याचे मूळ सापडते. स्वतःचा स्वार्थ साधावा, समाजास अमान्य मार्गाने वासनेचा निचरा करणे किंवा त्यासाठी जबरदस्ती करणे, स्वतःच्या काम, लोभादी वासनेसाठी दुसऱ्याचा घात करणे, फसवणे, दुःख देणे हे मनातील दुष्ट वासनेमुळे व पाप बुद्धीमुळे

वर्तन घडते. साहजिकच त्यामुळे व्यक्ती व समाज स्वास्थ्यास बाधा पोहोचते. म्हणून संत रामदास मनाला वरील प्रमाणे उपदेश देतात व व्यक्ती व समाज स्वास्थ्यासाठी व्यक्तींच्या मनाला वरील प्रमाणे साद घालतात.

२ नको रे मना क्रोध हा खेदकारीI
नको रे मना काम नाना विकारीI
नको रे मना सर्वदा अंगीकारूI
नको रे मना मत्सरू दंभभारूII

उपरोक्त श्री मनाच्या श्लोकात व्यक्तीच्या मनात कोणती मानसिक विकृती नसावी? ती का नसावी? याबाबतचे विचार श्री रामदासांनी स्पष्ट केले आहेत. त्यांनी या श्लोकात क्रोध, काम, मद. यावे यावे काकांना टाळावे असे स्पष्ट केले आहे तथापि मानवी जीवनात या विकारांना वर्तनाना व्यक्ती व समाज जीवनात व्यवहार चालन्या इतपत स्थान आहे. हे विकार, वर्तन समाजमान्य मार्गाने, सामाजिक निती मूल्यांची ढासळण होणार नाही याची काळजी घेत मर्यादेतच वापरावेत यांचा अतिरेक सर्वदा व्यक्तींना व समाजाला दुःख देतात, समाज स्वास्थ्याला बाधा आणतात म्हणून या विकार वर्तेक अतिरिक टाळावा व स्वतःचा व समाजाचे स्वास्थ्य निर्माण करावे असे संत रामदास सांगतात, यामध्ये क्रोध खेदकारी म्हणजेच अप्रिय, इजा देणारा, इंद्रियावर ताबा नसणारा अथवा तोल ढासळवणारा असतो तर, समाजाला मान्य नसणाऱ्या मार्गाने काम वासना पूर्ण करणे, त्यासाठी बळजबरी, फसवणूक, अनैतिक मार्गाचा अवलंब व्यक्ती व समाज मनाचे स्वास्थ्य धोक्यात आणत असते तर मत्सर म्हणजे इतरांचा द्वेष, दंभ म्हणजे ढोंग हे निकोप स्वस्थ समाज निर्मितीला घातक ठरतात म्हणून या गोष्टी टाळल्या तर व्यक्ती व समाजाला स्वास्थ्य लाभते.

३ नको रे मना द्रव्य ते पुढीलांचेI
अति स्वार्थ बुद्धी न रे पाप सांचेI
घडे भोगणे पाप ते कर्म खोटेI
न होता मनासारिखे दुःख मोठेII

उपरोक्त श्लोकात संत तर रामदास सांगतात दुसऱ्याचे द्रव्य, संपत्ती आपल्याला फुकट मिळावे असे वाटणे, त्यासाठी वाम-मार्गाचा अवलंब करणे, बळजबरी करणे, इजा पोहोचवणे, छळ करणे, फसवणे हे अति स्वार्थ बुद्धीचे लक्षण असून त्याने निश्चितपणे व्यक्ती व समाज स्वास्थ्य धोक्यात येते म्हणून दुसऱ्याचे द्रव्य संपत्ती फुकटात मिळावी हा विचार सुद्धा मनातून करू नये त्यामुळे तुझ्या जीवनात पाप म्हणजेच वाईट वर्तनाचा संचय वाढत जाईल व तुझे पर्यायाने समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येईल.

४ मना सर्वथा सत्य सोडूं नको रेI
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रेI
मना सत्य ते सत्य वाचे वदावेI
मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावेII

उपरोक्त श्लोकात संत रामदास मनाला (व्यक्तीला) सांगतात की, जे सत्य आहे त्याचीच कास धर स्वार्थ व लोभासाठी असत्याचा संग करू नको. जे खोटे आहे, समाज अमान्य आहे त्याचे समर्थन कधीच करू नकोस नेहमी सत्याचा स्वीकार कर, सत्यच बोल आणि जे खोटे आहे त्याचा त्याग

कर यामुळे व्यक्ती व समाज स्वास्थ्य निर्माणास सहाय्य होईल.

५ मना पाप संकल्प सोडूनी द्यावाI
मना सत्यसंकल्प जीवि धरावाI
मना कल्पना ते नको विषयांचीI
विकारे घडे हो जनी सर्व छी छीII

मनाला उपदेश देताना वरील लोकात स्पष्ट केले आहे की, व्यक्तीने पाप संकल्प म्हणजेच चुकीचे वर्तन, गुन्हेगारी वर्तन करण्याचा संकल्प, विचार सुद्धा करू नये. तो विचार येत असेल तर सोडून द्यावा, त्याऐवजी नेहमी सत्य संकल्प, समाज व व्यक्ती स्वास्थ्यासाठी पोषक विचारांचा स्वीकार करावा. तसेच विषय म्हणजेच विकार अथवा चुकीच्या वर्तनाची कल्पना सुद्धा करू नये. आचरण तर दूरच, कारण अशा विकारी वर्तनामुळे समाजात तुझी अप्रतिष्ठा होईल.

६ देहे त्यागिता कीर्ती मागे उरावीI
मना सज्जना हेची क्रिया धरावीI
मना चंदनाचे परि त्वा झिजावेI
परी अंतरी सज्जना नीववावेII

संत रामदास उपरोक्त श्लोकात सांगतात की तुझे एक व्यक्ती म्हणून, समाजाचा सदस्य म्हणून वर्तन नेहमी समाज मान्य नियमानुसार असावे तू कुटुंब, समाजासाठी चांगले योगदान द्यावेस की तुझ्या मृत्यू नंतर ही तुझी कीर्ती समाजाने सांगावी असे आदर्श वर्तन तुझ्याकडून घडावे तू तुझे आयुष्य समाजासाठी खर्च घालावेस चंदन जसा सुगंध देते तसा सुगंध तुझ्या वर्तनाचा समाजात दरवळवावा की ज्यायोगे समाजस्वास्थ्यास ते पोषक ठरेल.

**निष्कर्ष :**

1. व्यक्ती व समाज दृष्ट्या ‘श्री मनाचे श्लोकातील’ विचार महत्त्वपूर्ण आहेत.
2. ‘श्री मनाच्या श्लोकातून’ समाज व व्यक्ती स्वास्थ्यासाठी व्यक्तीचे वर्तन खूप महत्त्वाची भूमिका पार पाडते हे स्पष्ट होते.
3. व्यक्ती व समाजस्वास्थ्यासाठी नैतिक मूल्ये नैतिक वर्तनाचा स्वीकार महत्त्वाचा ठरतो हे स्पष्ट होते.
4. अनैतिक वर्तन हे त्या व्यक्तीबरोबरच त्याच्या समाजाच्या स्वास्थ्यालाही बाधा आणते हे स्पष्ट होते.

**संदर्भ :**

1. प्रा. के. वि बेलसरे, ‘सार्थ मनाचे श्लोक’, प्रकाशक श्री मारुती बुवा रामदासी चिटणीस श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड
2. डॉक्टर जोगेश्वर नांदुरकर, ‘मनोबोधाचे इंग्रजी विवेचन’ मासिक ‘रघुवीर समर्थ’ प्रकाशक - श्री सूर्याजी गवालक्ष स्वामी, सातारा नोव्हेंबर 2020
3. प्रा. डॉक्टर नरेंद्र कुंटे, ‘समर्थांचे शिक्षण शास्त्र’ मासिक ‘रघुवीर समर्थ’ संपादक श्री भूषण स्वामी, सातारा एप्रिल 2019
4. श्री विवेक रामदासी, ‘रंग नामी रे मना’ मासिक जून 2020 ‘रघुवीर समर्थ’ प्रकाशक श्री सूर्याजी स्वामी सातारा